महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २३ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



# भिवंडीतील भव्य छत्रपती शिवाजी महाराज मंदिर

## मंदिर दर्शनस्थळ नव्हे तर शक्तीपीठ



पर्यावरण आणि पर्यटन
लेख १





महाराष्ट्रातील मुघलांची सत्ता उलथवून हिंदवी स्वराज्याची स्थापना करून हिंदूचे राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य ईतीहास कुणाला माहित नाही असा एकही इसम या महाराष्ट्रात सापडणार नाही मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा ईतीहास मंदीराच्या रुपाने सर्वांपर्यंत कसा पोहचेल यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचे श्रद्धास्थान व आराध्य दैवत म्हणून ओळखले जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले भव्य दिव्य मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा या ठिकाणी काही धेय्यवेड्या तरुणांनी अल्पावधीतच उभारून महाराष्ट्रातील संर्वासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

४ मार्च २०१८ मध्ये भूमिपूजन झालेल्या मंदिराचे काम पूर्ण झाले आहे. मध्यंतरीच्या कोरोना महामारीच्या संकटामुळे त्यामध्ये थोडा उशीर झाला असला तरी त्यानंतर अधिक जोमाने काम सुरू करून मंदीर पुर्ण करण्यात आले हे मंदिर फक्त दर्शनस्थळ न बनता हे शक्तीपीठ असावे जेथे महाराजांचे जीवन समाजातील सर्व वर्गासाठी प्रेरणादायी राहील असा कटाक्ष ठेवून या मंदिर उभारणीचा संकल्प केला असल्याचे सांगण्यात आले. शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, शिवक्रांती प्रतिष्ठानचे पदाधिकारी ह. भ. प. कैलास महाराज निचीते बांधकाम ठेकेदार श्रीकांत गायकर मंदीराचे वास्तुविशारद विशाल पाटील विधीसल्लागार अँड. पंढरीनाथ हुलावले व इतर प्रतिष्ठानचे विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी महाराजांचे हे मंदिर पुर्णत्वास आले असुन मंदीर गडकोट किल्ल्यांसारखे दिसावे म्हणून विवीध गडकिल्ल्यांची अनेक महिने पाहणी करुन दीड एकर जागेत उभारलेल्या मंदिराच्या भोवती किल्ल्यासारखी तटबंदी उभारण्यात आली आहे या तटबंदीवरून मंदीराभोवती फिरता येते तसेच या तटबंदीवरून परीसरातील डोंगर , झाडी, निसर्गरम्य परिसर पाहता येतो तसेच येथे गड किल्ल्याला असतो तसे भव्य लाकडी प्रवेशद्वार उभारण्यात आला असून भव्य दिव्य मुख्य दरवाजा सर्वाचेंच लक्ष वेधुन घेत आहे. तटबंदीचे सर्व बांधकाम दगडांनी केलेले आहे तटबंदीच्या खालील ३५ चबुतऱ्यां मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध इतिहासकालीन प्रसंगांचे देखावे म्युरल पिक्चर रुपात साकारण्यात आले आहेत.या चित्राची माहिती येथे भेट देणाऱ्या शिवभक्तांना कळावी शिवाजी महाराजांचा इतिहास सर्वानां माहीत व्हावा यासाठी चित्रा खाली प्रसंगानुरूप ईतीहास लिहण्यात आला आहे.या परिसरात केवळ मंदिर नव्हे तर गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्याची सुविधा व शस्त्र प्रशिक्षण केंद्र, इत्यादी विभाग सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मूर्तिकार अरुणयोगी राज यांनी अखंड कृष्णशिला काळा पाषाणातून छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक मूर्ती साकारली असुन ही मुर्ती येथील भव्य दिव्य अशा मंदीरात विराजमान झाली आहे. मंदीराला ४७ कळस असुन मंदीराचे बांधकाम इटालियन मार्बलने केले असुन मंदीर परीसरातील दीपमाळा सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे गाभारा सभामंडप हा परिसर २५०० चौरस फूट क्षेत्राचा असून तटबंदी दीड एकर क्षेत्रात आहे.तर मंदीराच्या आजुबाजुला सुंदर बगीचा उभारण्यात आला असुन त्यातील विविध शोभेची फुलझाडे सर्वाचेच लक्ष वेधून घेत आहे. तर मंदीर परीसरात इतिहासकालीन हत्ती, घोडे, तोफा, मावळे उभारण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदीर महाराष्ट्रात नव्हे तर देशात नावारूपाला येणार असुन जेथे हे मंदीर उभे राहत आहे ते मराडेपाडा (कोशीबें) भिवंडी हे गांव सुध्दा या मंदीरामुळे अल्पावधीतच नावारूपास आले आहे.भिंवडी तालुक्यातील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदीराचे लोकार्पण विविध मान्यवर साधु, संत, ईतीहासकार, यांच्या उपस्थितीत दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करून अडीच महिन्यांपूर्वी मंदीराचे लोकार्पण करण्यात आले. आतापर्यंत या मंदीराला सहा लाखापेक्षा जास्त शिवभक्तांनी भेट दीली असुन भव्य दिव्य मंदीर बघून त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटले आहे. नुकताच तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज मंदीरात शिवराज्याभिषेक व छत्रपती संभाजी महाराज जंयतीचा उत्सव विविध कार्यक्रमाव्दारे साजरा करण्यात आला हे मंदीर परीसरासह राज्यातील तरुणाईचे श्रध्दास्थान बनले असुन मंदीर पाहण्यासाठी नागरीकांचा ओघ वाढत आहे. भिवंडी वाडा रस्त्यावरील धोंडावडवली बस स्टॉपवरुन अडीच तीन किलोमीटरवर तर भिवंडी शहरापासून १८ मुंबई नाशीक महामार्गावरील पडघा शहरापासून १५ किलोमिटरवर मुंबई पासुन ६० तर ठाणे शहरापासून ४० तर कल्याण शहरापासून ३० किलोमिटरवर छत्रपती शिवाजी महाराजाचें भव्य दिव्य मंदीर असुन खाजगी वाहनाने अथवा राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस पकडुन अथवा प्रवाशी रिक्षा, वाहनाने मंदीरापंर्यत जाता येते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २१ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



## मनोगत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताचा आज सहावा वर्धापन दिन सहा वर्षांपूर्वी लावलेल्या एका छोट्याशा रोपट्याचं आज हळूहळू वटवृक्षांमध्ये रूपांतर होत आहे, आपण एखादं बीज लावावं आणि सगळ्यांनी मिळून त्याला खत पाणी घालून त्याचं संगोपन करण्यासाठी अत्यंत विश्वासू आणि मेहनती टीमवर्क हवं असतं ; दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताला आपल्या सगळ्यांच्या माध्यमातून हे टीम वर्क लाभलं हे आम्ही आमचे भाग्य समजतो

वृत्तपत्र क्षेत्रात सहा वर्ष निस्वार्थ परिश्रम करून आज आम्ही सातव्या वर्षात पदार्पण करत आहोत याचा आनंद वाटत आहे. एका अर्थाने हा वर्धापन दिन असला तरी वृत्तपत्रासाठी तो सामाजिक आणि लोकशाहीच्या जबाबदाऱ्या निष्पक्षपणे पार पाडण्याच्या प्रतिज्ञेचा उत्सवच देखील असतो. असंख्य वाचकांनी आमच्यावर जो विश्वास ठेवला आहे तो विश्वास अजून मजबूत करण्यासाठी धारण करण्याचं व्रत म्हणजेच वर्धापन दिन असं आम्ही समजतो.

दै. ठाणे जीवनदीप वार्ताचा ६ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने "पर्यावरण आणि पर्यटन" हा विशेषांक आज आपल्याला सादर करताना आम्हाला आनंद आणि समाधान वाटत आहे. गेल्या सहा वर्षांच्या कालावधीत अनेक स्थित्यंतरे अनुभवून जीवनदीप वार्ताने आपला उत्कृष्ट दर्जा राखत वाचकांसमोर सातत्याने वास्तववादी बातम्या आणि दर्जेदार लेखन प्रसिद्ध करून महाराष्ट्रातील असंख्य वाचकांच्या हृदयात आपले स्थान निर्माण केले आहे, व ते पुढेही कायम राहील. समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांना वृत्तांच्या माध्यमातून निष्पक्ष आणि निर्भिडतेने वाचकांसमोर प्रस्तुत करण्याचे काम दै. ठाणे जीवनदीप वार्ताने आजवर केले आहे; तसेच हा वसा पुढेही असाच कायम सुरू राहील. असंख्य वाचक, हितचिंतक आणि आपल्या सारख्या व्यक्तींच्या जाहिरात स्वरूपी भरीव पाठबळामुळेच आम्हाला यशाचं हे उंच शिखर अल्पावधीत गाठता आले, याची आम्हाला जाणीव आहे. आपल्या या अमूल्य सहयोगाबद्दल आम्ही आपले नेहमीच आभारी राहू ! "पर्यावरण आणि पर्यटन" हा विषय घेऊन दै. ठाणे जीवनदीप वार्ता आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने ७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. यानिमित्त असंख्य वाचक पत्रकार वितरक जाहिरातदार हितचिंतक कार्यकर्ते, सहकारी आणि कर्मचारी या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

## मुंबईत ठाकरेंचे टेन्शन वाढले

### दोन नगरसेवकांचा भाजपात प्रवेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युती करण्याबाबत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान, शिवसेना ठाकरे गटाला सतत धक्के बसत आहेत. रविवारी, ठाकरे गटातील दोन माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबई भाजप अध्यक्ष आणि मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत या .नगरसेवकांना पक्षात प्रवेश केला. शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक ईश्वर तायडे आणि माजी नगरसेविका आकांक्षा शेट्टी यांनी आज त्यांच्या १०० हून अधिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आशिष शेलार यांनी पक्षात प्रवेश करून त्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार प्रवीण दरेकर, मुंबई भाजप उपाध्यक्ष कमलाकर दळवी उपस्थित होते.

## मुंबईतील पर्यटकांची माळशेज घाटात रॅश ड्रायव्हिंग!

### आदिवासी पाड्यातील ग्रामस्थांना जोराची धडक एकाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** माळशेज घाटातील धबधबे आणि हिरव्या दुलईत फिरण्यासाठी आलेल्या मुंबईतील एका पर्यटकांच्या मोटारीने माळशेज घाट परिसरात राहणाऱ्या एका आदिवासी पाड्यातील दोन पादचारी ग्रामस्थांना शनिवारी जोराची धडक दिली. या धडकेत एक ग्रामस्थ जागीच ठार झाला. दोन ग्रामस्थ गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर संतप्त झालेल्या स्थानिक ग्रामस्थांनी माळशेज घाट रस्त्यावर चार तास रस्ता रोको आंदोलन करून वाहतूक रोखून धरली. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले.

पुणे, अहिल्याबाईनगर, जुन्नर भागातून मुंबईत येणारी आणि मुंबईतून जुन्नर, अहिल्यानगर, आळेफाटा भागात जाणारी वाहने माळशेज घाटाच्या दोन्ही बाजुला रस्ता रोको आंदोलनामुळे शनिवारी दुतर्फा अडकून पडली. सुरूवातीला टोकावडे पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांची मने वळवून त्यांना रस्ता रोको आंदोलनापासून परावृत्त करण्याचा आणि या प्रकरणातील दोषर्षीवर कठोर कारवाई होईल यादृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थ पोलिसांचे म्हणणे ऐकण्यास तयार नव्हते.

या अपघातात मुरबाड तालुक्यातील माळशेज घाट भागातील आवळेचीवाडी येथील खंडू मेंगाळ हे मोटारीने दिलेल्या धडकेत जागीच ठार झाले. त्यांचे दोन सहकारी गणेश नवसू भला, दिनेश नवसू सिंगवा गंभीर जखमी झाले. दोन्ही जखमींमधील एकाला आळेफाटा येथील रुग्णालयात, अन्य एका जखमीला मुरबाड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली मनपावर मोर्चा

### ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे सह १२५ शिवसैनिकांवर गुन्हा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेने कचऱ्यावरील वाढीव वापर शुल्क रद्द करावे, या मागणीसाठी उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डोंबिवली जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी दोनशेहून अधिक शिवसैनिकांचा मागील आठवड्यात कल्याण डोंबिवली पालिका मुख्यालयावर मोर्चा काढला होता.



मोर्चा काढल्यानंतर पोलिसांनी घालून दिलेल्या अटीशर्तींचे उल्लंघन मोर्चेकरांनी केल्याने पोलिसांनी जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रेसह महत्वाचे नऊ पदाधिकारी आणि १२५ शिवसैनिकांवर बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

हवालदार विशाल चौधरी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस ठाण्यातील तक्रारीतील माहिती, अशी की कल्याण डोंबिवली पालिकेने कचरा वापर शुल्कात वाढ केली आहे. ही वाढ अन्यायकारक असल्याने ठाकरे गटाचे डोंबिवली जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी गेल्या आठवड्यात पालिकेच्या कल्याणमधील मुख्यालयावर मोर्चा काढला होता. साहाय्यक पोलीस आयुक्तांनी अटीशर्ती घालून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही या अटीवर मोर्चाला परवानगी दिली होती. मोर्चा पालिका मुख्यालयासमोर अडविण्यासाठी पोलिसांनी रस्तारोधक उभे केले होते.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला

# माहुली गड (किल्ला)



माहुली गड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यात एक अभेद्य असा किल्ला आहे भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक १९ मार्च इ.स. १९९० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून धोषित केलेले आहे. आसनगांव या रेल्वे स्थानकापासून हा किल्ला ५ किमी अंतरावर आहे. या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे बरेच दिवस वास्तव्य होते असे सांगितले जाते किल्ल्याजवळून भारंगी नदी वाहते. ही नदीं भातसई नदीची उपनदी आहे. ठाणे जिल्ह्यात असणारा माहुली किल्ला छत्रपती शिवाजी

महाराजानी १६६१ मध्ये मुघलांकडुन जिंकून घेतला होता. पुरंदरच्या तहात तो पुन्हा मुघलांकडे गेल्यावर सन १६७० मध्ये मोरोपंतांनी तो परत जिंकून घेतला शिवाजी महाराजांच्या पृत्युनंतर शंभुराजेंच्या काळात मराठ्यांचे किल्ले लढुन जिंकता येत नसल्याने औरंगजेबाने ते फितुरीने जिंकण्याचा प्रयत्न सुरु केला. माहुली किल्लेदार व्दारकोजी यांचे मन वळवण्यासाठी नरसु महाडिक यांना मध्यस्थ नेमले त्याच्या प्रयत्नाने किल्लेदार व्दारकोजी मुघल सरदार अब्दुल कादिर याला भेटला आणि म्हणाला की सदर किल्लेदार असोजी प्रमाणे मला मनसब दिली तर मी किल्ला खाली करीन आणि ४० हजार रुपये, १० घोडे, खिलत इनाम जागिर व राहण्यासाठी जवळची दोन गावे वतन दिली तर मी स्वतः दरबारात हेजेरी देण्यासाठी येईन. माहुलीचा किल्लेदार व्दारकोजी अब्दुल कादिराला भेटला ती तारीख होती २१ ऑगस्ट १६८८..

भौगोलिकदृष्ट्या शहापुरच्या वायव्येला असेलला हा किल्ला मध्ययुगीन कालखंडात भोवतालच्या महत्वाच्या ठिकाणाशी जोडलेला गेला होता कल्याण शहराजवळ माहुली किल्ला म्हणून शिवकाळात व्याला विशेष महत्व होते तसेच नाशिक व सुरत परिसराशी सुध्दा माहुलीचा संबंध होता माहुली वरून जव्हार मार्गे सुरत तर माहुली करून नाशिक आणि माहुली वरुन किन्हवली मुरबाड मार्गे नाणेघाट ओलांडून जुन्नर तसेच अहमदनगर अश्या भौगोलिक रचनेमुळे माहुलीला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. ठाणे, कल्याण, जाव्हार, नाशिक, सुरत, मुरबाड अश्या महत्वाच् ठिकाणाना माहुली किल्ला जोडलेला असल्याने त्याला महत्व प्राप्त झाले होते.

सह्याद्रीच्या पर्वतारांगामध्ये येणारा आणि अधिजन्य खडकापासून बनवलेला किल्ला एक दुर्गत्रिकुट आहे. माहुली, भंडारणड आणी पळसगड मिळूत हा किल्ला तयार झाला आहे. त्यामुळे ह्या किल्याची रचना तीन वेगवेगळ्या भागांनी बनलेली आहे. मध्यभागी माहुली, उत्तरेस पळसगड आणि दक्षिणेत भंडारगड अश दुर्गत्रिकुटानीं एक दुर्ग बनलेला असून त्यातील

माहुली हा मोठा किल्ला आहे.

### किल्याचे वर्णन आणि पोहचण्याबाबत माहिती।

माहुलीगाव ते किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत या १० मिनिटांच्या रस्त्यात आपल्याला एकुण ४ मंदिरे लागारात ही मंदिरे सुध्दा ऐतिहासिक आहेत. प्रथम मास्तीचे मंदिर लागते. या मंदिरात असणारी मारुतीची मुर्ती जुनी आहे.

विहिरीच्या समोर एक शिवमंदिर असुन त्याला माहुलेश्वेर असे म्हणतात या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला असुन मंदिराच्या प्रवेशव्दारालगतच नंदी असून नदींच्या पायावरील काम पाहता त्याचे प्राचीन नक्षिकाम लक्षात येते. त्यांच्या पायाकडे पाहीले असता ते जमिनीच्या समान पातळीवर नसून काहीसे खाली आहे मंदीरातील गाभा-यातील शिवप्रतिमेच्या मागे एका कोनाडयात मता पार्वतीचे शिल्प आहे. या माहुली मंदिरात माहुलीच्या संक्षित इतिहास माहुलीची रचना दुर्गप्रेमी मंडळाने लिखीत केली आहे मंदिराकडे तोंड करून उभे राहिल्यावर मंदिराच्या बाजून उजव्या हाताला एक रस्ता जातो. तो माहुली किल्ल्यावर उगम पावणाऱ्या भारंगी नदीकडे जातो पावसाळ्या व्यतिरीत या नदीला फारसे पाणी नसते मंदिराच्या डावीकडे देवीचे मंदिर असून त्यातील देवीची मूर्ती शिवकालीन असल्याचे सांगितले जाते. यातील मुख्य मूर्तीही श्रीच्या मूर्तीसारखी आहे. असे पुजारी सांगतात. या दोन्ही मंदिराच्या आसपास काही प्राचीन शिल्पसुध्दा विखुरलेली आहेत. देवीच्या मंदिरामागे एका पिंपळ वृक्षाखाली चौथऱ्यावर शिवलिंग व गणेशमूर्ती आहे माहूलेश्वर मंदिराच्या मागून एक पायवाट जाते या पायवाटेने पुढे गेल्यास दोन ते तीन मिनिटांच्या अंतरावर गणेश मंदिर असून त्याचा जिरणोध्दार झाला आहे. मंदिराच्या समोर एक दगडी घुमट, अर्धवट फुटलेला पाटा, पुष्दप्रसंगाचे चित्रण असलेले अर्धवट फुटलेले विरगळ आहे. या चारही मंदिरातील मूर्ती किती जुन्या आहेत हे सांगता येते तसेच अशक्य आहे पण त्या शिवकालीन वा पेशवेकालीन म्हणेजेच मध्ययुगीन तर नक्कीच आहेत. तर पेशवेकाळात यातील काही मंदिराची स्थापना झाली असे मानले जाते. किल्याचा इतिहास आणि पायथ्याचा परिसर एकदा लक्षात आल्यानंतर प्रत्यक्षात किल्ला चढणे व किल्याची पाहणी करणे सोपे जाते. मुळात हा एकच किल्ला नसून दुर्गत्रिकुट आहे. मध्यभागी माहुली उजवीकडे पळसगड आणि डावीकडे म्हणजे काहीसा पश्चिमेकडे भंडारगड असे हे त्रिकुट असल्याने एका दिवसात हे तीनही पाहता येणे शक्य आहे. गडावर जाण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत किल्ल्याचा महादरवाजा हा मूळ मानला जातो. एका खडकावर कातळ खोदून पायऱ्या खोदलेल्या असून पहारेकरांच्या देवड्या कोरलेल्या आहेत या देवाच्या पुढे बुरुज उभारले आहेत वास्तविक ही किल्ल्यावर जायची मूळ वाट आहे पण या वाटेवर केवडयाचे वन वाढलेले आहे. त्यामुळे या मुख्य वाटेवर दुर्लक्ष झालेले आाहे या महादरवाजा बरोबरच भंडारगडावरुन कल्याण दरवाजाव्दारे किल्यावर जाता येते पण हा मार्ग खुपच अवघड असल्याचे स्थानिक सांगतात त्यामुळे जाण्यासाठी गणेश मंदिराच्या समोरुन गेलेली पायवाट हाच एक योग्य मार्ग आहे. सध्या या पायवाटेने किल्ल्याकडे जाता येते. या पायवाटेने जातांना वाटेत एक डोंगराचा सुका व डोंगराची कड़ा दिसते तिचा आकार घोडयाच्या मानेसारका असल्याने त्याला घोड्याची मान असे म्हणतात तेथून पुढे वर आल्यानंतर वाट साधी आणि एकदम उभी चढणीची होते. येथे आपण माहुलीच्या किल्ल्यावर येतो कड़ा.अजून चढुन जाण्यासाठी सुमारे ८-९ फुट उंचीची एक लोखंडी शिडी आहे. पूर्वी ही किही मोकळी होती. आता मात्र ती मजबूत केली आहे. संपूर्ण शिडी चढतांना हे एकाच ठिकाण आहे ते मात्र जपून जावे लागते. शिळी चढून वर आल्यानंतर जवळजवळ किल्यात मागील बाजूने प्रवेश होतो. हा पायवाटेचा मार्ग मुळच्या महादरवाज्याच्या वाटेपासून किमान पाच फुटापेक्षा दूर आहे किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर डावीकडे झाडाझुडपात न जाता उजवीकडे जी पायवाट आहे. तेथून महादरवाजाकडे जाता येते. तेथे एक पाण्याचे टाकी व देवता म्हणजे पाहरेकऱ्याची जागा हे दूसरी एक पाण्याचे टाकी शिडी चढुन वर आल्यानंतर लगेच दिसून येते. पायथ्याशी शिवमंदिरासमोर विहीर आणि दोन टाकी या व्यतिरीक पाण्याची सोय अन्यत्र नाही, महादरवाजाच्या वरून उजवीकडे न जाता सरळ वरच्या अंगाकडे गेल्यानंतर प्राचीन कलाकुसरीची काही शिल्प आढळतात ते उर्दू लिपीतील शिलालेख असून त्याचा अर्थ स्पष्ट झालेला नाही. या जागेला नमाजगिर असे म्हणतात नमाजगिराच्या उजवीकडे गेल्यानंतर एका महत्वाचे अवशेष आढळतात एकेकाळी चिरेबंदी असणाऱ्या वाड्याचे अवशेष शिल्लक आहेत. किल्यावरच्या पठाराच्या मध्यभागी एक तळे असून त्याला माहुलेश्वराचे तळे असे म्हणतात पळसगडावरून तानासातलावाचे विहंगम दृश्य दिसते पळसगडावर जाणारी वाट बांबूच्या बनातून जाते या ठिकाणाला पळसगढ़ का म्हटले जाते हे सांगता येत नाही. मात्र कदाचित येथे पूर्वी पळसाची झाडे विपुल प्रमाणात असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

यालाच गिर्यारोहक छोटा माहुली असेही म्हणतात माहुलीच्या डाव्या बाजूस म्हणजेच काहीसा दक्षिणेस भंडाररगड आहे भंडारगड नाव पडण्याचे मुख्य कारण माहुली गडावरील या विकाणी भांडार असावे. या गडाच्या दक्षिणेस चार शुक्र असून त्याता स्थानिक लोकांनी भटजी, नवरा, नवरी, करंगळी अशी नावे दिलेली आहेत. माहुलीवरील टाक्यांकडून भंडारगडाच्या दिशेने जातांना दोन शिल्पे असून त्यांचे चेहरे डुकरांसारखे आहेत. म्हणून त्याला हुक्कतोंडी असे म्हणतात. पायथ्याजवळील मंदिराच्या परिसरात पडलेल्या विरगळ प्रमाणे एक विरगळ हे मध्यभागी काही ज्योतीसुध्दा आहे. त्याच्यापुढे हरवलेली माहुलेश्वर मंदिराची जागा आहे. भंडारगडावर दहा खांबाचा एक हत्तीखाना असून येथे कायम थंडगार पाणी असते. माथ्यावर

पश्चिम दिशेला किल्याचा मुख्य दरवाजा कल्याण दरवाजा आहे. कल्याण सुभ्याकडून येणार रस्ता म्हणून त्याला कल्याण दरवाजा असे नाव मिळाले असावे या दरवाजातील आतल्या बाजूस मराठीत एक शिलालेख असून त्याची भाषा दुर्बोध आहे. माहुली किल्ला व भंडरगड वांच्यामध्ये एक आडवी तिडवी पसरलेली खिंड असून भंडारगडावर पोहोचण्यासाठी खिंड उतरुन एक डोंगर चढ़ावा लागतो पळसगडावरील दरवाजातून खाली उतरण्याची वाट अत्यंत अवघड आहे. एका बसंत एक ब्रिजलेला व अर्थबोध न होणारा लेख व काही कोरीव पायऱ्या आहेत. तर दरवाज्याजवळ एक टाके असून त्याला माठ टाक म्हणतात तेथून पुन्हा माहुलीकडे जातांना उजव्या बाजूस एका डोंगराच्या माध्यावर कड्यापाशी एका दरवाजाचे अवशेष आढळतात, याला हनुमान दरवाजा म्हणतात. तेथुन पुढे हनुमान व गणपतीची कोरीव शिल्पे आहेत. तेथुन खाली पायथ्याशी येणे किवा माहुलीच्या मध्यभागी जाऊन त्या रस्त्याने पायथ्याशी येता येते. परंतु या वाटेने स्थानिक लोकच ये जा करु शकतात कारण बाट अवघड आहे भंडार गडाच्या दक्षिणेस असलेल्या चार सुळक्यांचा व खिंडीच्या अलीकडे एक डोगर असून त्यास माहुली चंदेरी नावाने ओळखले जाते. पण हे नाव मुळचे नाही माहुली किल्यावरील भारंगी नदी तेथे उगम पावते. ही नदी पायध्याला वेढा धालून पुढे जाते तेथून ती शहापुर येथून शेवटी भातसा नदीला जाऊन मिळते.

असे एकंदरीत माहुली किल्याचे स्वरूप असून दोन शिलालेख, कल्याण, हनुमान व महादरवाजा, चिरेबंदी वाड्याचे अवशेष, पाण्याच्या टाक्या, माहुलेश्वर, मंदिर, तळे, मुरुरुज, देवधा, विरगळ, घोड्याची मान,

भटजी, नवरा, नवरी व करंगळी हे सुळके, तीन जोती, डुक्करतोंडी शिल्प, हनुमान व गणेशाची शिल्पे, तानसा तलाव पॉईन्ट , भारंगी नदीचा उगम, सुर्योंदय व सूर्यास्त, खिन्द्री, दही, बाबू व केवड्याची बने, पावसाळ्यातील धबधबे त दुथडी भरुन वाहणारी भारंगी नदी, किल्याच्या पायथ्याशी असणारी चार मंदिरे, माथेरान पेक्षाही उंच व थंड हवा, हिरवीगार वनश्री यामुळे माहुली हे पर्यटकांना आकर्षित करणारे ठरले आहे. वानरे, ससे, माकडे, डुकरे, हरीण हे प्राणी व मोर, घार, गिधाड, यासारखे पक्षी तर सरपटणारे विषारी साप असे येथील वन्य जीवन समृध्द आहे. सावरोली रस्त्यावरील सरकारी गोदामाजवळ एक वाघोबाचे मंदिर आहे. माहुलीच्या जंगलातील वाघाचा आपणांस उपद्रव होऊ नये म्हणून हे मंदिर बांधले गेल्याचे सांगितले जाते. यावरुन माहुलीच्या वन्यजीवनाची कल्पना येते माहुलीवरील सुळके, माहुली किल्ला व भंडारगड यामधील खिंड, वाटेवरील शिडी, हनुमान दरवाजा व कल्याण दरवाजा वरून खाली उतरण्याची वाट याठिकाणी दक्षता घ्यावी लागते सकाळी लवकर जाऊन संध्याकाळी परतणे शक्य आहे. किल्यावर राहायची व्यवस्था नाही. स्थानिक लोकांना विचारून रस्त्याची माहिती करुन घ्यावी माहुली किल्ला हे पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे. किल्ल्यावरील व पायध्यावरील ऐतिहासिक अवशेष हा आपल्या इतिहासाचा व संस्कृतीचा एक अनमोल ठेवा असून पर्यटकांनी, गिर्यारोहकांनी आणि अभ्यासुनी त्याचे योग्य ते जतन करावे.



# जीवनदिप महाविद्यालय गोवेलीचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे आज जीवनदीप शैक्षणिक संस्थेचा 21 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कित्येक वर्षांपूर्वी रवींद्र घोडविंदे यांनी लावलेल्या एका रोपट्याचं आज वटवृक्षात रूपांतर झालंय. आज जीवनदीप शैक्षणिक संस्थेची 21 वर्षांची समृद्ध शैक्षणिक वाटचाल पूर्ण होत आहे. याप्रसंगी दरवर्षी प्रमाणे 20 हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणगौरव करण्यात आला.तसेच यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून हिंदू युवा सेना संघाचे डॉ. विवेक मोडक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी केले. डॉ.मोडक यांनी योग दिनाच्या दिवशी होत असलेल्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात प्रामुख्याने योगाचे महत्व सांगत जीवनदीप संस्थेचा आजपर्यंतचा झालेला प्रवास सांगितला.त्याचबरोबर संस्थेचे







अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी संस्थेचा झालेला प्रवास सांगत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. यावेळेस समाजामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्यांपैकी अनेकांना गौरविण्यात त्यामध्ये क्रीडा क्षेत्रात साहसी कामगिरी केलेले अजित कारभारी सामाजिक कार्य करणारे आदेश चौधरी सोमनाथ राऊत पर्यावरण वन्यजीव रक्षक प्रवीण भालेराव शैक्षणिक पेटंट प्राप्त प्रा.राजाराम कापडी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य जयकुमार रिजवानी आधार अपंग संघटनेचे भगवान सुरोशे, गंधवे गुरु स्कूल संस्था टिटवाळा च्या वैदही नादगायकर यांचा सहभाग होता.तसेच अनेक उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत विद्यार्थ्यांना शिक्षणाप्रती प्रोत्साहित करत समाजामध्ये बदल घडवण्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. सतीश लकडे व प्रा, नरेश टेंभे यांनी केले. याप्रसंगी जीवनदीप महाविद्यालयाच्या संचालिका सौ स्मिता घोडविंदे, संचालक शांताराम भोईर, प्रशांत घोडविंदे, हिंदू युवा संघ सेना चे सदस्य अविनाश नेवे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुदाम पाटील सामाजिक कार्यकर्ते कोंडु नाना भोईर, पत्रकार नरेंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते माणिक मगर,वसंत मगर, भाजपा नेते मुरलीधर चौधरी, माजी सरपंच फळेगाव रवींद्र जाधव, पत्रकार संजय कांबळे, जयतु मुठोलकर, जानू बुटेरे, विजय देशेकर संचालक डॉ.के बी कोरे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य जयकुमार रिजवानी निर्मल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका भावना कुंभार तसेच सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पर्यावरण आणि पर्यटन लेख ३

# ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक वज्रेश्वरी देवी मंदीर



महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील तानसा नदीकाठी वसलेले हे स्थान त्याचे मुळ नाव वडवली असुन वज्रेश्वरी देवीच्या नावावरून गावाचे नाव वज्रेश्वरी हे नाव पडले असुन ऐतिहासिक वज्रेश्वरी देवी मंदीर हे लाखो देवी भक्तांचे एक प्रसिध्द श्रद्धास्थान आहे.

वज्रेश्वरी मंदीर हे ऐतिहासिक व पुराणीक मंदीर असुन कलीकाल आणी सिंहमाल हे राक्षस उन्मत्त झाल्याने देव ऋषी मुंनीना त्रास देत होते या त्रासापासून सुटका मिळावी म्हणून सर्वजण गुरु विशिष्ठ मुनीकडे गेले व व राक्षसांच्या त्रासापासून सुटका मिळावी म्हणून विनंती केली. त्यानुसार गुरू विशिष्ठ व देव या गावात आले व त्यांनी राक्षसांच्या परिहारासाठी त्रीचंडीयाग यज्ञ केला व त्यात प्रत्येक देवाच्या नावाने आहुती दिली. यामध्ये देवांचा राजा इंद्र याची आहुती द्यायला विसरले त्यामुळे इंद्राला कारण मिळाले आणी त्याने गुरु विशिष्ठ मुनीशी युध्द सुरू केले. त्यामुळे अडचणी सुटण्याऐवजी वाढल्या या युद्धामध्ये इंद्राने त्याचे वज्रास्त्र वशीष्ठांवर सोडले त्यामुळे महाभयंकर वातावरण निर्माण झाले त्यापासून सुटका करण्यासाठी सर्वांनी आदीमाया आदिशक्ती हीचे आवाहन केले आदिशक्ती म्हणजे पार्वती माता हीने आक्राळ विक्राळ रुप घेऊन आ करून जबड्यात इंद्राचे वज्रास्त्र गिळले म्हणून पार्वती मातेला आपण ईश्वरी माता म्हणतो इंद्राचे वज्रास्त्र उदरात घेतले म्हणुन वज्रेश्वरी माता स्थान निर्माण झाल्याचे पुराणात सांगण्यात आले आहे. व देवीने देव ऋषी मुनींचे कल्याण केले. जेंव्हा देव ऋषी आपापल्या ठिकाणी जात असताना गुरु वशीष्ठांनी प्रार्थना केली की आमचे कल्याण केले मात्र नंतर तुझे भक्त येतील तेव्हां त्यांचे काय म्हणून तु येथून जाऊ नको म्हणून आई काली, लक्ष्मी, सरस्वती तिन रूपात येथे राहीली. तसेच प्रकृती, संस्कृती, विकृती याचे प्रतीक म्हणुन रेणुका, वज्रेश्वरी, व कालीका अशी या देवीची स्थापना झाली. पुराणांमध्ये नवनाथ कथासार ग्रंथांमध्ये मच्छींद्रनाथ, गोरखनाथ हे वनीच्या देवीचे दर्शन घेऊन या ठिकाणी आले असता वनीच्या देवीने सांगितले माझे पुढचे रुप हे वज्रेश्वरी येथे आहे तेथे येऊन माझी सेवा त्यानुसार बाजुला असलेल्या नदीत नावाने कुंड तयार करून महीनाभर पाणी आणुन आईला आंघोळ घातली आहे. त्यामुळे वज्रेश्वरी आईचे स्थान हे किती प्राचीन आहे याची कल्पना आपण करू शकतो. तसेच वज्रेश्वरीच्या बाजुला २२ते २३ कीलोमीटरवर वसई किल्ला असुन या किल्ल्यावर मराठ्यांनी अनेक वेळा आक्रमण केले तरी त्यानां यश आले नाही

१७३४ साली चिमाजी आप्पा पेशवे यांनी पोर्तुगीजांपासुन वसईच्या प्रजेची सुटका करण्यासाठी वज्रेश्वरी देवीसमोर नतमस्तक होऊन देवीसमोर नवस केला की वसईचा किल्ला जिंकला तर देवीचे मंदिर बांधीन त्यामुळे देवीने चिमाजी आप्पा यांना स्वप्नात दृष्टांत दिला की किल्ल्याच्या समोर कबुतरांचा थवा ज्या बाजुने उडेल त्या बाजुने आक्रमण करा त्याप्रमाणे चिमाजी आप्पाने कबूतर उडालेल्या बाजुने आक्रमण केल्याने पोर्तुगीजांचा दारुगोळा व इतर साहीत्य उध्वस्त झाला वसईचा किल्ला जिंकता आला ज्या ठिकाणी हा साक्षात्कार झाला त्या ठिकाणी १७३८ साली चिमाजी आप्पांनी वज्रेश्वरी देवीचे मंदीराचे काम सुरु केले काम सुरु असताना चिमाजी आप्पांचे निधन झाले त्यानंतर त्यांच्या सरदारांनी मदीर पुर्णत्वास नेले त्यावेळी १२३८ रुपये खर्च आला होता. वज्रेश्वरी मंदीरात शारदीय नवरात्रोत्सव, चैत्र शुध्द प्रतिपदा ते रामनवमी व वार्षिक यात्रा हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. तर वज्रेश्वरी मंदीर परीसरात आकलोली येथे गरम पाण्याची कुंडे असुन गणेशपुरी येथे स्वामी नित्यानंद यांचे भव्य मंदीर व परिसरात विविध तिर्थस्थळे आहेत. मुंबई वेस्टर्न रेल्वेने वसई विरार नालासोपारा या स्टेशनवरून २२ते २३ किलोमिटरवर असलेल्या वज्रेश्वरी साठी एकेक तासाने बस सुरु असतात तर ठाणे कल्याण वरुन भिवंडी तेथुन अंबाडी नाक्यावरून वज्रेश्वरी देवीचे मंदिराकडे प्रवाशी बस, रिक्षेने किंवा खाजगी वाहनाने जाता येते भिवंडी पासुन वज्रेश्वरी मंदीर १९ किलोमिटर ठाण्यापासून ४२ तर कल्याण पासुन ३० किलोमिटरवर आहे. कुठल्याही प्रकारची अंधश्रद्धा न पाळता स्वतः कोणी बोललेल्या नवसाने अनेकांच्या इच्छा आंकाक्षा पुर्ण झाल्याचे बोलले जात आहे त्यामुळे वज्रेश्वरी देवीची शक्ती, मंहती, जागृतीचा महीमा या ठिकाणी नक्कीच अनुभवायला मिळतो. निसर्गाच्या सान्निध्यात व डोंगरदऱ्याच्यां कुशीत वसलेल्या वज्रेश्वरी देवीच्या भक्ती बरोबर ग्रामीण संस्कृती व निखळ निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी वज्रेश्वरी पर्यटकांसाठी एक पर्यटन स्थळ आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
**SHREYAS PROJECTS**
Civil Engineers & Contractors
Specialist in Piling Works & All types of
Industrial Construction
Email: mlthakur.shreyas@gmail.com
"Om Sai" Vadgaon Road, Chinchpada,
Pen-Raigad - 402107 Mob.: 9822478930, 9145673366
**Proprietar-Mahendra Laxman Thakur**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता या लोकप्रिय दैनिकास
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
**रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : श्री अमरचंद पाटील |
| कार्याध्यक्ष | : श्री. प. जा. म्हात्रे |
| सरचिटणीस | : श्री गुरुनाथ पाटील |
| कोषाध्यक्ष | : श्री. जगन्नाथ मोकल |
| महिला प्रमुख | : श्रीम. उज्वला निकम |
| सल्लागार | : श्री. प्र. शं. म्हात्रे |
| राज्यप्रतिनिधी | : श्री. अविनाश म्हात्रे |
| पेण तालुका अध्यक्ष | - श्री. राजाराम गावंड |
| उरण तालुका अध्यक्ष | - श्री. अभिमन्यू गावंड |
| खोपोली न. प. अध्यक्ष | - श्री. कृष्णा मोकल |
| पनवेल तालुका अध्यक्ष | - श्री. नरेश पाटील |
| ज्येष्ठ सभासद | - श्री. बापूजी म्हात्रे |
| पेण सरचिटणीस | - श्री. मुरलीधार म्हात्रे |
| पेण कोषाध्यक्ष | - श्री प्रदीप म्हात्रे |
| पेण सल्लागार | - श्री. पांडुरंग अं. म्हात्रे |

सर्व तालुका व जिल्हा कार्यकारिणी सभासद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
लोकप्रिय दैनिकास
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
(उद्धव बाळासाहेब ठाकरे)
**मा. श्री. समीर सुभाष म्हात्रे**
पेण तालुका प्रमुख
(शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे)
कार्याध्यक्ष - सहयाद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
**मा. श्री. जीवन शंकर पाटील**
- निवृत्त सहाय्यक अभियंता - बृहन्मुंबई महानगरपालिका जलकामे तातडीची दुरुस्ती विभाग
- मा. संचालक - दि. म्युनिसिपल को.ऑप.बँक लि. मुंबई
- उपाध्यक्ष - म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन मुंबई

**मा.श्री. प्रविण शंकर पाटील**
- इलेक्ट्रिकल इंजिनिअर
- अध्यक्ष पेण शहर कॉंग्रेस कमिटी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त... हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
रायगड भुषण
**श्री. रविंद्र रजनी रमेश म्हात्रे (पप्पू सर)**
संचालक :- श्री पाटणेश्वर अर्बन को-ऑप.बँक लि. पेण.
उपाध्यक्ष :- एल्वो बॉक्सिंग असोसिएशन इंडीया.
उपाध्यक्ष :- एल्वो बॉक्सिंग असोसिएशन महाराष्ट्र
उपाध्यक्ष :- युनाइटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडिया
अध्यक्ष :- रायगड जिल्हा थांग-ता असोसिएशन
अध्यक्ष :- रायगड जिल्हा एल्वो बॉक्सिंग असोसिएशन
उपाध्यक्ष :- रायगड बॉक्सिंग असोसिएशन
सरचिटणीस :- पेण शहर भारतीय जनता पार्टी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिननिमित्त...
हार्दिक शुभेच्छा
**मा. श्री.गिरीधर काशिनाथ पिंगळे (गुरुजी)**
- बी.ए.ऑनर्स, बी.एड.प्रथम श्रेणी,
- आदर्श शिक्षक रायगड जिल्हा परिषद
- कवी कथाकार लेखक
- मुंबई रत्नागिरी आकाशवाणी केंद्रावर कविता वाचन
- माजी सरपंच गोरठण बु ।। ता. खालापूर



INFORMATION TECHNOLOGY
DATA SCIENCE
MANAGEMENT STUDIES
ACCOUNT FINANCE
MASS MEDIA




Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
**JEEVANDEEP COLLEGE**
Permanantly Affiliated to University of Mumbai
NAAC Accredited "B" Grade
**ADMISSION OPEN 2025-26**
Contact us : GOVELI 8108559566
Contact us : KHARDI 8669244522




# पर्यावरण आणि पर्यटन

## पर्यावरण समतोल - सामूहिक जबाबदारी

आपल्याला निरोगी आणि प्रदूषणमुक्त आयुष्य जगायचे असेल, तर आजूबाजूचे पर्यावरण नेहमी स्वच्छ असणे आणि स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने दरवर्षी प्रयत्न केले जातात. शासकीय/प्रशासकीय पातळीवर पर्यावरण दिन साजरा होतोच. एक प्रश्न सतत मनात येतोच, की असे दिवस साजरे करून पर्यावरणाचे संवर्धन होणार आहे का? ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो. तो पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करून, समस्या जाणून घेऊन पर्यावरणाची गुणवत्ता वाढावी म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे हाच पर्यावरण दिन साजरा करण्या मागचा प्रमुख हेतू आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास का होतो? पर्यावरणाचे संतुलन का बिघडते? याला आपण किती जबाबदार आहोत? निसर्गातील बदल, अनियमितपणा किती कारणीभूत आहे? याचाही विचार करावा लागेलच. खरं म्हणजे, पर्यावरण आणि प्रदूषण यांचा खूप जवळचा संबंध आहे. अनेकविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास प्रामुख्याने होत असतो. मग निसर्गनिर्मित असो वा मानवनिर्मित असो, याचा विचार करणे गरजेचे आहे. निसर्गनिर्मित कारणांमुळे होणाऱ्या कारणावर आपण काय करणार? ती एक प्रकारची आपत्तीच असते. पण आपल्याकडून ज्या ज्या कारणांमुळे प्रदूषण निर्मिती होते ती आपण नक्कीच कमी करू शकतो. दरवर्षी पर्यावरण दिवस साजरा करताना एक घोषवाक्य असते. जसे ५ जून २०११ सालात भारताची प्रथमच यजमानपदी निवड झाली होती. "वन निसर्ग आपल्या सेवेसी" असे घोषवाक्य होते. परत दुसऱ्यांदा ५ जून २०१८ मध्ये भारताची यजमानपदी निवड झाली, तेव्हा "प्लास्टिक प्रदूषणाशी संघर्ष" असे घोषवाक्य होते. पर्यावरण दिवस कोलबियात साजरा झाला, त्यावेळी "जैवविविधता" हे घोषवाक्य होते. जैवविविधता म्हणजेच जीवांची विविधता. मग त्यात पशू, पक्षी, निरनिराळे प्राणी येतात. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जैवविविधता संपन्न असायला हवी.

आपण बघतो निरनिराळ्या कारणांमुळे ही कमी होत आहे. त्याच्यावर उपाययोजना करायला हव्यात. पर्यावरणाचा समतोल न राहण्याचे प्रदूषण हेच महत्त्वाचे कारण कसे आहे हे बघू आणि आपला सर्वसामान्य माणसाचा त्याच्याशी काय संबंध आहे, आपण काय करू शकतो, काय करत नाही. हे पहाणेही उचित ठरेल. तसेच शासकीय/प्रशासकीय पातळीवर काय करता येईल, काय होत नाही, तेही बघायला लागेल. पृथ्वीवरील जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण होणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे.





Hon. FOUNDER PRESIDENT
Dr. RAJKUMAR KOLHE

|| तमसो मा ज्योतिर्गमय ||
www.jmftrust.com

Hon. SECRETARY
Dr. PRERANA R. KOLHE

JAHNVIS MULTI FOUNDATION'S
JAN GAN MAN ENGLISH SECONDARY SCHOOL
AFFILIATION NO.: 1131054 | SCHOOL NO.: 31031 | U-DISE NO.: 27210607104
AN ISO 9001:2015 CERTIFIED SCHOOL | MOB.: 8655030896
JANA GANA MANA VIDYAMANDIR & JR. COLLEGE
OF ARTS, COMMERCE - BANKING & SCIENCE (CS & IT) RECOG. BY GOVT. OF MAHARASHTRA
Index No. S.16.17.230 U-DISE No.: 27210607105 Index No.: J 16.17.080 U-DISE No.: 27210607404
Directorate Of Vocational Education and Training Govt. Of Maharashtra
JMF'S INSTITUTE OF PARAMEDICAL SCIENCES
JMF MOVIES
Imppa- Indian Motion Picture Productions' Association Membership No- 18102
• BUDGE FILE PRODUCTION • EDITING • AD SHOOT • WEB SERIES • SHORT FILM • FILM STUDIO • PRODUCTION • PHOTO SHOOT • MUSIC STUDIO• ALBUM SHOOT • DANCE STUDIO • DOCUMENTARY • CHROMA SHOOT • PRE WEDDING SHOOT
www.jgmschool.in | www.jgmvidyamandir.com | www.vandemataramcollege.com | www.jmftrust.com
JMF Sanskriti Vihar, Dr. Nemade Marg, Old Dombivli (W), Maharashtra - 421202
8655030889 | 8655030896
JAHNVIS MULTI FOUNDATION'S
VANDE MATARAM DEGREE COLLEGE
OF ARTS, COMMERCE & SCIENCE (Affiliated to University of Mumbai)
Accredited by NAAC (2nd Cycle) with 'B++' Grade (CGPA- 2.91) | ISO 9001: 2015 Certified
• B.A. : History • B.A. : Economics • B.A. : English Literature • B.A. : Film, TV & New Media Production
• B.A. : Multimedia & Mass Communication • B.Com. : Accountancy • B.Com. : Banking & Insurance
• B.Com. : Transport Management • B.Com. : Financial Management • B.Com. : Accounting & Finance
• B.Com. : Management studies • B.Sc. : Chemistry, Botany, Zoology • B.Sc. : Computer Science • B.Sc. : IT
• M.A. HISTORY • M.Sc. INFORMATION TECHNOLOGY • M.Sc. ORGANIC CHEMISTRY • M.Com. ADVANCED ACCOUNTANCY
MKCL AUTHORISED COMPUTER TRAINING CENTRE
VMDC KAUSHAL CENTRE Centre No. 78210887
• Accounting Careers • Digital Arts Careers • Designing Careers
• Programming Careers • Back Office Careers • Management Careers
MKCL || ज्ञानदीप लावू जगी || www.mkcl.org
MS-CIT आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL KLiC Courses Gateway to Knowledge Lit Careers
For more details on KLiC Courses & MS-CIT, Contact
9768529397



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
कवी डॉ. देविदास क. बामणे
अध्यक्ष हिंदी विभाग भाऊसाहेब नेने कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण जि.रायगड

- "डॉ विवेकी राय: व्यक्तित्व और कृतित्व " या विषयावर पी एचडी
- श्री मौनतीर्थ हिन्दी विद्यापीठ, उज्जैन पीएचडी पदवी प्राप्त.
- महाराष्ट्र हिंदी परिषद संयुक्त सचिव
- अध्यक्ष पेण मराठी साहित्य मंडळ
- मराठीत स्वरचित दोन एकांकी व सात पथनाट्य
- ग्रामीण जीवन पुस्तकाला हिंदी साहित्य मधील प्रसिद्ध साहित्यिक फणीश्वरनाथ नाथ रेणू पुरस्कार

हिंदी प्रचार-प्रसार या कार्यासाठी प्रेमचंद पुरस्कार आणि पारस काव्य कला संस्थेचा नागार्जुन पुरस्कारासह ३० पुरस्कार प्राप्त



दैं. ठाणे जीवनदीप वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक :- डॉ. संदेश गावंड (एमडी आयुर्वेद)
डॉ. नंदिनी गावंड (एमब एस आयुर्वेद)








दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे रायगड आणि पालघर जिल्ह्याचे लोकप्रिय वृत्तपत्र दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
श्री. समीर रमेश चिटणीस
माजी अध्यक्ष - भाजपा डोंबिवली पश्चिम मंडल







भारतीय जनता पार्टी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे रायगड आणि पालघर जिल्ह्याचे लोकप्रिय, निष्पक्ष निर्भीड आणि वास्तववादी बातम्यांचा आढावा घेणारे ठाणे जिल्ह्याचे मुखपत्र दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता आणि परिवारास सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

# आमदार श्री. रवींद्र चव्हाण

कार्यकारी अध्यक्ष भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश



ठाणे जिल्ह्याचे मुखपत्र दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता आणि परिवारास सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

## सुंदरवन सामाजिक उन्नती आणि वृक्ष लागवड सहकारी संस्था मर्यादित

रजि. क्र. : टीएनए/बीडब्ल्युआय/जिएनएल/एस/३३१/१९९३

श्री. हितेश वडालीया — चेअरमन
श्री. दिपक चौधरी — खजिनदार
श्री. अशोक नागपाल — सेक्रेटरी

श्री. मिलिंद गुप्ते - व्यवस्थापक

* सन्माननिय संचालक *

डॉ. गायत्री महावरकर, श्री. प्रविण सालीनकर, सौ. जुही सालीनकर
श्री. विशाल संघवी, श्री. वसंत विष्णु देव, कॅप्टन भुवनेश पुरी,
श्री. अनिल त्रिवेदी, श्री. भरत शेट्टी

मु. आन्हे-सोर, व्हाया पडघे, ता. भिवंडी, जि. ठाणे - ४२१ १०१.



## Expert Classes

५ वी ते १० वी (इंग्लिश मिडीयम)



आपल्या मुलांच्या उज्वल शैक्षणिक भविष्यासाठी त्वरित संपर्क साधा



श्री महेंद्र चोरघे सर
(B.E Mech) 9834994607

श्री विनीत शेलार सर
(B.E Mech) 9518334697

पडघे ता. भिवंडी जि. ठाणे - ४२१ १०१

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

## श्री.चेतन रामचंद्र पाटील

युवा उद्योजक पडघा दळेपाडा



## ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे

ता. भिवंडी, जि. ठाणे

सौ. सुमन कृष्णा वाघे (सरपंच)
श्री. परेश सोनावणे (ग्रामपंचायत अधिकारी)



श्री. दिनेश दत्तात्रेय ठाकरे
प्र. सरपंच ग्रामपंचायत डोहळे

सन्माननिय सदस्य

सौ. छाया पंढरीनाथ हरड
श्री. नवनाथ अनंता सवर
श्री. सचिन सिताराम घोडविंदे
श्री. शुध्दोधन अशोक जाधव
सौ. रेश्मा निवृत्ती मगर
श्री. ज्ञानेश्वर अनंता ठाकरे
सौ. वसुदा वासुदेव शिंदे
सौ. मोनिका मोहन पालवी
श्री. विजय रमेश हरड
सौ. करुणा विजय वारके
सौ. विणा विष्णु पाटील
श्री. एकनाथ पांडुरंग जाधव (वरिष्ठ लिपिक)
श्री. काळुराम पोशा घोडविंदे (कनिष्ठ लिपिक) श्री. पांडुरंग शिंदे (शिपाई)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

संकल्प बहुउद्देशिय सामाजिक संस्था
महा/४५४/०४/ठाणे - एफ/१३२१५/ठाणे.
स्वयंशिस्त, संस्कार, गुणवत्ता व कला-कौशल्य आधारित शिक्षण.
प्रवेश सुरु २०२५-२०२६
सर्वोदय विद्यालय
R. T. New English School
छोटा शिशू ते १० वी,
मराठी, सेमी इंग्रजी, इंग्रजी माध्यम
- वार्षिक १२ परीक्षा
- स्पर्धा परीक्षा तयारी
- योगाभ्यास
- भगवद्गीता पठन
- उपनिषद अभ्यास
- नियमित व्यायाम
- भव्य क्रीडांगण
- सुसज्ज ग्रंथालय
- वाहतूक व्यवस्था
- प्रशिक्षित शिक्षक





१६ विद्या
प्लम्बिंग, कार्पेन्ट्री, पॉटरी मेकिंग, फॅशन डिझाईनिंग, इलेक्ट्रिशियन, सर्व्हेइंग,
कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी, फॅब्रिकेशन, फूड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर असेम्बलिंग
कराटे, गायन, हार्मोनियम वादन, तबला वादन, रोपवाटिका, अॅग्रीकल्चर
संपर्क - 8828770573 / 9373595877 / 7678093723
कार्यालयीन पत्ता : १४८९, सर्वोदय, कल्याण-शिळ रोड, मु. पो. निळजे द्वारा मानपाडा, ता. कल्याण, जि. ठाणे

महाराष्ट्र जनरल मजदुर संघटना (रजि.)
असंघटित नाका कामगारांच्या
न्यायहक्कासाठी लढणारी विश्वसनीय संघटना
ठाणे जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक ठाणे जीवनदीप वार्तास
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री. लक्ष्मण माणिकराव मिसाळ
(संस्थापक - अध्यक्ष)

दैनिक
ठाणे जीवनदीप वार्ताच्या
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
मा.श्री.अॅड.मंगेश नेने
अध्यक्ष : पेण एज्युकेशन सोसायटी
पेण, रायगड

भारतीय जनता पार्टी
कल्याण जिल्हा
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे जीवनदीप वार्ता या लोकप्रिय
दैनिकाच्या सहाव्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. नंदकिशोर घनश्याम परब (नंदू भाऊ)
(कल्याण जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी)



जीवनदीप महाविद्यालय गोवेली, म्हसा आणि
खर्डी तर्फे दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा !!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्तास
६व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. रवींद्र धर्मा पाटील
माजी सरपंच : निळजे ग्रामपंचायत
सरचिटणीस : डोंबिवली ग्रामीण भारतीय जनता पार्टी
संस्थापक अध्यक्ष : धर्मराज फाउंडेशन


ग्रामपंचायत कुंरुद
ता. भिवंडी जि. ठाणे
ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचे
लोकप्रिय वृत्तपत्र दैनिक
ठाणे जीवनदीप वार्ताच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
सौ. दिपाली दिलीप केदार
सरपंच
सौ. निकिता मुकेश जाधव
उपसरपंच
श्री. नितीन देशमुख
ग्रामपंचायत अधिकारी
श्री. श्रीकांत मायकर
श्री. संदिप कालोले
सौ. जान्हवी जगदीश पाटील
सौ. विशाखा विश्वनाथ भोईर
सौ. भावना भगवान सांबरे
सौ. रेश्मा गणेश बाधे
श्री. सुनिल मोरे
सौ. शितल विकास पाटील (लिपीक) श्री रविंद्र विठ्ठल घोडविंदे (दिवाबत्ती /सहाय्यक लिपीक)
श्री पंकज शनिवार जाधव (वसुली लिपीक /शिपाई)


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
राष्ट्रीय ओबीसी
बहुजन शिक्षक संघ
राष्ट्रीय ओबीसी बहुजन
शिक्षक महासंघ
महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री.बाळाराम पाटील
माजी शिक्षक आमदार
कोकण विभाग
ॲड .बी.एल.सगर किल्लारीकर
माजी सदस्य राज्य मागासवर्गीय
आयोग महाराष्ट्र राज्य.
अनिल नाचपल्ले
प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी बहुजन
शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य.
श्री. संतोष भोजने
राज्य सरचिटणीस
श्री सुखदेव भालेकर
प्रदेश उपाध्यक्ष
श्री बबनराव चव्हाण
प्रदेश कार्याध्यक्ष
श्री.संजय भोईर
राज्य कोषाध्यक्ष
श्रीम. रेखा सुडे
महिला प्रदेशाध्यक्ष
श्री.सचिन गडपतवार
राज्य प्रसिद्धीप्रमुख
श्री राजन पाटील
खाजगी विभाग प्रमुख
श्री. श्रीराम पळसकर
मनपा प्रमुख
श्री गोरख आघाव
कोकण विभाग प्रमुख
श्री. संजय मळभागे
मराठवाडा संपर्कप्रमुख


ग्रामपंचायत पडघा ता. भिवंडी जि. ठाणे
ग्राम सचिवालय पडघा
कुलस्वामीनी किराणा स्टोअर्स
धर्मवीर आनंद दिघे साहेब प्रवेशद्वार
E-LIBRA
श्री. रविंद्र नारायण विशे
सरपंच
श्री. भास्कर हनुमंत घुडे
ग्रामपंचायत अधिकारी
सौ. नयना संजय जाधव
उपसरपंच
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
सामान्य प्रशासन विभाग
आपला परिसर स्वच्छ ठेवा, घरपट्टी पाणीपट्टी वेळेवर भरुन ग्रामपंचायतीस सहकार्य करा




लेख क्रमांक : ०५

# पर्यावरण आणि पर्यटन
## ठाणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळे

ठाणे जिल्ह्यात फिरण्यासाठी अनेक सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळे आहेत. धार्मिक स्थळांपासून ते ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्थळांपर्यंत, येथे पर्यटकांसाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत.

**टिटवाळा:** सिद्धिविनायक महागणपती मंदिर: हे मंदिर काळू नदीच्या काठी असून महाराष्ट्रातील आठ प्रसिद्ध गणपती मंदिरांपैकी एक आहे.

**वज्रेश्वरी:** गरम पाण्याचे कुंड: भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी हे गाव गरम पाण्याच्या कुंडांसाठी प्रसिद्ध आहे.

**अंबरनाथ:** अंबरेश्वर मंदिर हे मंदिर हेमाडपंथी वास्तुशैलीत बांधलेले असून, जिल्ह्यातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे.

**कोपिनेश्वर मंदिर:** ठाणे शहरामधील हे एक प्राचीन मंदिर आहे.

**वसई किल्ला:** हा किल्ला पोर्तुगीजांनी बांधला असून मराठा राजवटीतही याला महत्त्व होते. किल्ल्यात अनेक वाडे, बुरुज आणि खांब असलेले दालन आहे.

**घोडबंदर किल्ला:** हा किल्ला ठाणे शहराच्या जवळ असून ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

**नाणेघाट:** प्राचीन व्यापारी मार्ग म्हणून ओळखला जाणारा हा डोंगरी मार्ग ट्रेकर्ससाठी एक सुंदर ठिकाण आहे.

**येऊर:** निसर्गरम्य टेकड्या: येऊर आणि पारसिक टेकड्यांमुळे ठाणे शहराला एक खास ओळख मिळाली आहे. येथे ट्रेकिंगसाठी अनेकजण जातात.

**ठाणे खाडी:** या खाडीत बोट सफारीचा आनंद घेता येतो.

**तानसा धरण:** निसर्गरम्य परिसरात असलेले हे धरण पर्यटकांसाठी एक सुंदर ठिकाण आहे.

**ओवळेकर वाडी फुलपाखरू उद्यान:** हे उद्यान एक सुंदर बाग असून, विविध प्रकारच्या फुलपाखरांचे ते घर आहे.

**माहुली किल्ला:** हा किल्ला ट्रेकिंगसाठी एक उत्तम ठिकाण आहे.

**इतर स्थळे:** गडकरी रंगायतन: हे एक नाट्यगृह असून येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि नाटके आयोजित केली जातात.


**कल्याणचे विठ्ठल मंदिर:** विठ्ठल मंदिरासाठी कल्याण हे शहर प्रसिद्ध आहे.

माळशेज घाट: पावसाळ्यात या घाटाला विशेषतः भेट दिली जाते.












# पर्यावरण आणि पर्यटन

# पर्यावरण संरक्षण व संवर्धनात आपली भूमिका...

**निसर्ग हेच खरे जीवन असले तरी आजच्या घडीला मानवजातीसमोर असणारे सर्वात मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास ! आपण आपल्या अति हव्यास व लालसेपोटी आणि आपल्या सुखासीन आधुनिक जीवनशैली यामुळे दिवसेंदिवस आपण पर्यावरणाचा ऱ्हास झपाट्याने करत आहोत. तसेच वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या, वाढते प्रदूषण आणि संसाधनांचा अनियंत्रित वापर आदींमुळे आपण पर्यावरणाची समतोलता बिघडवत आहोत. यामागे आपली स्वार्थी वृत्ती, आपल्या चुकीच्या सवयी कारणीभूत आहेत......**

सृष्टी किंवा प्रकृती ही आपली जननी आहे. या सृष्टीलाच आपण निसर्ग किंवा पर्यावरण म्हणत असतो. मानवी जीवनात निसर्गाचे स्थान महत्त्वाचे असून निसर्ग हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. म्हणूनच आपण म्हणत असतो, 'निसर्ग हा माझा सोबती आहे. निसर्ग हा माझा गुरु आहे.

' 'पर्यावरण' ही संकल्पना अत्यंत व्यापक, सर्वसमावेशक आणि मानव जीवनाशी निगडित अशी आहे. "पर्यावरण" हा शब्द संस्कृतमधील "परि" (भोवतालचा) आणि "आवरण" (आच्छादन) या शब्दांपासून तयार झाला आहे.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक, जैविक (सजीव), अजैविक (निर्जीव ) आणि सांस्कृतिक व सामाजिक घटकांचा मिळून बनलेला एक संपूर्ण आविष्कार. यामध्ये जल, वायू , दगड-माती, झाडे, वनस्पती, पशु-पक्षी, प्राणी, सूर्यप्रकाश, ऋतूचक्र, नद्या, डोंगर, प्रकाश, हवामान व तापमान, समाज, संस्कृती, चालीरीती आदींचा समावेश होतो. हे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले असून मानवी जीवन हे संपूर्णतः या पर्यावरणावर अवलंबून आहे. पर्यावरणाशिवाय मानवी अस्तित्वाला किंमत नाही.

विज्ञान व तंत्रज्ञानात कितीही प्रगती केली, तरी आपले अस्तित्व पर्यावरण वा निसर्गाशिवाय अशक्य आहे. पर्यावरणामुळे आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करता येतात. सूर्यप्रकाशामुळे ऊर्जा, उष्णता व जीवनसत्त्व मिळते, झाडांमुळे शुद्ध हवा मिळते, प्राणवायूचा स्त्रोत निर्माण होतो. पावसामुळे शेती फुलते, नद्या-नाले दुथडी भरून वाहतात, आपल्याला पिण्याचे पाणी देतात. निसर्ग सर्व सजीवांच्या जीवनाला सतत नवी उभारी देतो. निसर्गातील विविध घटना, प्रसंग उदा, सूर्योदय व सूर्यास्त, रंगीबेरंगी सुंदर सुंदर फुले, पक्ष्यांचा किलबिलाट, पावसाची विविध रूपे, अथांग निळ्याभोर सागराची गाज, निसर्गातील विविध ऋतूंचा नवा नवा व हवाहवासा वाटणारा साज, कधीतरी दिसणारा सप्तरंगी इंद्रधनुचा रम्य पसारा, नद्या-झऱ्यांचे खळखळ वाहने... हे सर्व आपल्या मनाला निरव शांती व निखळ आनंद देत असतात. मात्र, हे सर्व आज नामशेष होत चालले आहे, लोप पावत चालले आहे.

निसर्ग हेच खरे जीवन असले तरी आजच्या घडीला मानवजातीसमोर असणारे सर्वात मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास ! आपण आपल्या अति हव्यास व लालसेपोटी आणि आपल्या सुखासीन आधुनिक जीवनशैली यामुळे दिवसेंदिवस आपण पर्यावरणाचा ऱ्हास झपाट्याने करत आहोत. तसेच वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या, वाढते प्रदूषण आणि संसाधनांचा अनियंत्रित वापर आदींमुळे आपण पर्यावरणाची समतोलता बिघडवत आहोत. यामागे आपली स्वार्थी वृत्ती, आपल्या चुकीच्या सवयी कारणीभूत आहेत.

पर्यावरणाच्या वाढत्या ऱ्हासामुळे प्रदूषण, जंगलतोड, प्राणी व वनस्पतींचा नाश, जागतिक तापमानवाढ, जैवविविधतेचा ऱ्हास, महापूर, भूकंप, त्सुनामी, भूस्खलन, हवामान बदल, पाण्याची टंचाई, ढगफुटी, वादळ, अवकाळी पाऊस इत्यादी गंभीर परिणाम निर्माण होत असलेले आपण पाहत आहोत. आज जगभर तापमान वाढते आहे, पावसाचे चक्र बदलते आहे, पाण्याचे संकट गहिरे होते आहे. दिवसेंदिवस ग्लोबल वॉर्मिंग यांसारख्या गंभीर समस्या उग्र स्वरूप धारण करत आहेत.

लेखक -
**शारदासुत सुनील म्हसकर**
**(एम.ए.बी.एड.आणि डी.एड.)**
**संस्थापक अध्यक्ष - स्वामी विवेकानंद संस्था पाली, शहापूर**
**सहशिक्षक - सिताराम रामा पाटील विद्यालय आमणे, भिवंडी**

म्हणूनच, आपल्या वसुंधरेला देखणे रूप आणून देण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे ही काळाची गरज असून त्यात आपली भूमिका फार महत्वाची आहे. नव्हे, तर ती आपली नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवले तरच मानवी जीवनाची शाश्वतता राहू शकते. स्वच्छ, सुंदर, समृद्ध पर्यावरणासाठी आपल्याला सजग माणूस व सुजाण, संवेदनशील नागरिक बनावे लागेल. आज प्रदूषित हवा, पाणी व अन्नामुळे अनेक रोग व आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. केवळ मानवी नव्हे, तर सर्व सजीवांच्या निरोगी आयुष्यासाठी आपणास स्वच्छ व सुंदर पर्यावरणाची नितांत गरज आहे. पर्यावरणाचे रक्षण म्हणजे आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक आहे.

आपणास कल्पना आहे की, शुद्ध हवा आणि पाणी उपलब्ध करून देणे, अन्नधान्य, औषधी वनस्पती यांचा स्रोत असणे, जैवविविधतेचे रक्षण करणे, हवामानाचा समतोल राखणे, नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करणे इत्यादी बाबतीत मानवी जीवनात पर्यावरणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपलं जीवन पर्यावरणावरच अवलंबून आहे. असे असतांनाही आपण तितक्या गांभीर्याने व खबरदारीने वागत नाहीत. म्हणून, आपण प्रत्येकाने पर्यावरणपूरक अशा जीवनशैलीचा अंगीकार केला पाहिजे. आज जैवविविधतेचा विचार करता, अनेक वन्यप्राणी व वनस्पती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. ते केवळ आपल्याच हातात आहे. म्हणूनच पर्यावरणाचे जतन करणे ही आपल्या सर्वांची अत्यंत महत्वाची अशी सामूहिक जबाबदारी आहे. "एकमेंका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" या उक्तीने आपण पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रामाणिकपणे पेलण्याचा संकल्प करून तो कृतीत आणला पाहिजे.

'विकास' आणि 'संवर्धन' यांचा समतोल राखणे हीच आपल्या शाश्वत भविष्याची गुरुकिल्ली आहे, हे आपण विसरता कामा नये. "पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा!" ही हाक देत आपण कृतीतून आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. त्यासाठी आपण प्रत्येकाने ठरवले पाहिजे की, 'मी व माझा परिवार नेहमीच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करेल. तसेच सौर, पवन अशा नवीनीकरणयोग्य उर्जेचा जास्तीत जास्त वापर करेल. प्लास्टिकचा वापर कमीत कमी व आवश्यक तिथेच करेल. आवश्यक तिथे प्लास्टिकचा पुनर्वापर करेल. नेहमी कापडी पिशव्याच वापरेल. सभोवताली असणाऱ्या झाडांचे संरक्षण करेल. दरवर्षी जास्तीत जास्त झाडे लावून त्यांची निगा राखेल. वेळोवेळी वृक्षारोपण करून जंगलांचे रक्षणही करण्याचा प्रयत्न करेल. पाणी, वीज, इंधन आदींचा अपव्यय टाळून त्यांचा काटकसरीने वापर करेल. आजूबाजूचा परिसर रोज न विसरता स्वच्छ व सुंदर ठेवेल. सार्वजनिक ठिकाणे नेहमीच सुंदर व स्वच्छ राहतील, याकडे विशेष लक्ष देईल. कोणत्याही प्रकारचे प्रदूषण करणार नाही व शक्यतो कोणाला करूही देणार नाही. आवश्यक तिथे जाण्यासाठी शक्यतो पायी चालत जाईल किंवा सायकलचा वापर करेल. आवश्यक तिथे सार्वजनिक व खाजगी वाहनांचा वापर करेल.

मी व माझा परिवार निरंतर पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा विचार करून तो विचार कृतीत आणेल. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची विविध कामे हाती घेईल किंवा त्यासंबंधीच्या शासनाच्या व इतरांच्या विविध कार्यक्रम व उपक्रमांत सक्रिय सहभाग घेईल. तसेच, पर्यावरण संरक्षण व संवर्धनाबाबत शाळा, समाज, प्रसार माध्यमांतून तसेच आवश्यक त्या माध्यमांतून पर्यावरणाचे महत्त्व सांगून जनजागृती व जनप्रबोधन करण्याचा प्रयत्न करेल. म्हणूनच, 'माझे पर्यावरण, सुंदर पर्यावरण' जोपासण्यासाठी माझी भूमिका ही संरक्षक व संवर्धकाची सजग अशी भूमिका असणार आहे.

आज आपण जागरूक व सजग राहिलो तरच आपण आपल्या उद्याच्या पिढीला निरोगी आणि सुरक्षित असे सुंदर पर्यावरण उपलब्ध करून देऊ शकू...

चला तर मग,

"निसर्ग वाचवूया, पर्यावरण जपूया. तुमचे, आमचे, वसुंधरेचे - भविष्य सुंदर करूया!"

# शिक्षकांच्या खात्यात जमा होणार अर्जित रजा

## ठाणे जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांना लाभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सुट्टीकाळात वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार असून भाजप राज्य कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व शिक्षक नेते अनिल बोरनारे यांच्या मागणीवरून ठाणे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले आहेत. या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्ह्यातील शेकडो प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना होणार आहे. राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. दीर्घ सुट्टीच्या काळात प्रशिक्षण अथवा इतर कामासाठी शिक्षकांना बोलावल्यास त्या दिवसांची अर्जित रजांची नोंद शिक्षकांच्या सेवा पुस्तिकेत केली जाते. तथापि अनेक ठिकाणी अशा नोंदी केल्या जात नसल्याच्या तक्रारी अनिल बोरनारे यांच्याकडे शिक्षकांनी केल्या होत्या. यावर बोरनारे यांनी शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देऊन शिक्षकांना अर्जित रजा मिळावी व तशा नोंदी करण्यात याव्यात, अशी मागणी केली होती. ही मागणी मान्य करीत शिक्षण उपसंचालकांनी व ठाणे शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले. या आदेशात "ज्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांनी वरिष्ठ वेतन श्रेणी/निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण (गृहपाठासह) पूर्ण केल्यामुळे त्यांना सुट्टी उपभोगण्यात प्रतिबंध झाला असेल त्यांच्या खाती अर्जित रजा जमा करण्याबाबत महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६ (१८) (अ) मधील वरील नियमानुसार कार्यवाही करावी," असे आदेश दिल्याने या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयांतर्गत असणाऱ्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शेकडो शिक्षकांना होणार असल्याचे अनिल बोरनारे यांनी सांगितले.

# ‘ पेणचा वारसा जपणारा इतिहास’

पर्यावरण आणि पर्यटन लेख ७

”पेण ” हे महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचे शहर आणि तालुक्याचे ठिकाण आहे. पेण गणपतीच्या मूर्तींचे माहेरघर म्हणून जगप्रसिद्ध आहे. आणि रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र आहे.

पेण करणे म्हणजे मुक्काम करणे. पेणे म्हणजे मुक्कामाची जागा. सैन्याचे, व्यापारी लमाणांच्या तांडय़ाचे, घाटावरून उतरणाऱ्या प्रवाशांच्या मुक्कामाचे ठिकाण म्हणून या गावाला नाव मिळाले पेण. बुद्धकाळापासून या पेणला जुन्नर - पुणे - नगर पासून माल येत असे. बंदर म्हणूनही पेण मोठे प्रसिद्ध ठिकाण होते. अंतोरे हे पेणचे तरते बंदर होते. ९ व्या ते १५ व्या शतकात पेण हे शिलाहार राजे, स्थानक राजे, यादव राजे, यांच्या अमलाखाली होते. हे गाव मोठी व्यापारी पेठ व समृद्ध शहर म्हणून कोकणात प्रसिद्ध होते.

व्यापारी लमाणांचे तांडे कार्ला,भाजे लेण्याच्या किंवा जांभूळपड्याच्या ठाणाळे लेण्याच्या परिसरात मुक्काम करीत. यामुळेच वाकरुळ, खानाव, हाळ, ठाणाळे व कोंदिवडे येथे मोठय़ा कोरून ठेवलेल्या गुहा व त्यात खोल्या आजही आढळतात. या लेण्यांच्या मार्गावर मोठमोठे तलाव खणलेले होते. पेण मधील कासार तळे, कुंभार तळे, चांभार तळे (आता जेथे स्टेडियम आहे.), कवंडाळ तळे, प्रभू आळीतील झिरडा तलाव, पाटणेश्वर तळे, मखमल तळे ही त्यातलीच. धावटे, अंतोरे, वडगाणी येथेही या व्यापारी तांड्यासाठी विहिरी व तळी बांधली होती. या तलावातूनच सैन्याच्या छावणीला पाण्याचा पुरवठा होई.

शिलाहार राजांच्या काळात देवीची शक्तिपूजा ही मोठी मानली जात असे. पेणची कासारआळीतील महाकाली, रामेश्वर मंदिरातील गावदेवी, वाशीची अंबा, खरोशीची केळंबा माऊली नागावची आक्कादेवी, चौल, धावटा येथील देवीची देवस्थाने त्या काळातीलच आहेत. शिवाची प्राचीन मंदिरे चालुक्यांनी व कदंबांनी बांधली. पेण शहरातील वाकेश्वर ( म्हणजेच आत्ताच वाकरूळ गाव ) दांडेश्वर (रामेश्वर) , व्याघ्रेश्वर, गोटेश्वर, पाचणोलीचे पाटणेश्वर ही मंदिरे त्या काळातली आहेत. अनेक शिवमंदिरे मलिक कपूर व निजामशाही सैन्याने वेळोवेळी राजापुरीवर केलेल्या स्वारीचे वेळी पाडून मोडून टाकलेली आहेत.

पेण शहरातले गोटेश्वराचे मंदिर तर फारच भव्य होते. या मंदिरापुढे असलेल्या नंदीच्या आकारावरुन मंदिरातील शिवपिंड किती मोठी असावी याची कल्पना येते. त्या काळात हे शिवमंदिर या पंचक्रोशीत प्रसिद्ध होते.

या मंदिरापुढे भव्य अशी पुष्करणी होती. या मंदिराचे आवारच ५ ते ६ एकराचे होते. या आवारात भव्य असा बगीचा होता. शाइस्तेखान पुण्याला आला असताना ताहेरखान नावाचा सरदार मि-या डोंगरावर आपली छावणी टाकून मुक्कामाला होता. ताहेरखानाने पेणवर छापा घातला त्यात हे शिवमंदिर उध्वस्त केले. पेणवर छापा घालण्यापूर्वी शिवाजी महाराजांनी २७ फेब्रुवारी १६६२ चे सुमारास मिऱ्याडोंगरावर छावणी टाकलेल्या खानास व रतनगडावरील बलाकी सरदारास वेढा घातला. खालापूर मधील चौक गावचे, सरदार नेतोजी पालकर यांनी उंबरखिंडीच्या युद्धात खानाच्या सैन्याकडून जांभुळपाडय़ाचा परिसर मुक्त केला. तर छत्रपती शिवाजीच्या, कावजी कोंडाळकराने रतनगड जिंकून बलाकी सरदारास पळविले. बारा हजार सैन्य व सातशे पायदळासह नेतोजी पालकराने मिऱ्या डोंगराला वेढा दिला. वाघोजी तुपे, मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, सचिव शंकर नारायण यांची कुमक येताच नामदार खानाचा पराभव होऊन खान पळून गेला.

दुस-या दिवशी २८फेब्रुवारी १६६२ रोजी सकाळीच छत्रपती शिवाजी महाराजाचे सैन्य वाघोजी तुपे या सरदाराच्या नेतृत्वाखाली पेणच्या गढीवर चालून गेले. पेणच्या गढीला वेढा पडला.








(पेणची मामलेदार कचेरी ) गढीचा संरक्षक खानही त्वरित तयारीनिशी वाघोजी तुप्याच्या समोर तलवारीनिशी उभा राहिला. समबल असलेले दोन्ही वीर लढत होते. दोन्ही वीर जखमांनी बेजार झाले. शेवटी एका योग्य क्षणी वाघोजी तुपे यांनी खानावर जबरदस्त प्रहार करून त्यास यमसदनास पाठविले. या लढाईत वाघोजी तुपेस २७ जखमा झाल्या. या युद्धात मरण पावलेल्या मराठा सरदारांच्या समाध्या मामलेदार कचेरीच्या प्रांगणात होत्या, आता मात्र डांबरीकरण आणि इमारत विस्तार करण्यात बहुतेक गायब झालेल्या आहेत.



इतिहासात पेणच्या बाबतीत अजून एक विशेष उल्लेख आढळतो तो जेष्ठ इतिहास अभ्यासक, ”गजानन भास्कर मेहंदळे” यांच्या ”शिवछत्रपतींचे आरमार” या पुस्तकात...

”इस १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी निजामशाही कोकण ताब्यात घेतला व त्यानंतर स्वराज्याच्या स्वसामर्थ्यासाठी, सुरक्षेसाठी, राज्याच्या सुबत्तेसाठी, सागरी वाहतूक उद्योग, बंदरापासून मिळणारे जकातीचे उत्पन्न आणि त्याही पेक्षा जंजिऱ्याच्या सिद्धीशी दोन हात करण्यासाठी कल्याण, भिवंडी आणि पेणला २० संग्विसेली (युद्धनौका) बांधण्याचे काम हाती घेतले, पोर्तुगीज रुय लैंताव व्हिएगश आणि त्याचा मुलगा फैरनाव व्हिएगश याच्या हाताखाली ३०० पौर्तुगीझ आणि टोपझ या तीन ठिकाणी महाराजांसाठी काम करत होते”

या बाबतीतला ऐतिहासिक संदर्भ आपल्याला पौर्तुगीझ दप्तरातल्या पत्रात सापडतो, वसईचा पौर्तुगीझ कॅप्टन आतोनियु द मेलु द काशत्रू यांनी याचा धसका घेतला आणि गोवाच्या भारतीय गव्हर्नरला याबाबतीत जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये कल्याण, भिवंडी सोबत आपल्या पेणचा उल्लेख आढळतो. या प्रकरणात भारतातील पोर्तुगीज राजाच्या सल्लागार मंडळात १९ जुलै १६५९ रोजी याबाबत महत्वाची चर्चा करून, जी पोर्तुगीज मंडळी शिवाजी महाराजांना यासाठी मदत करीत आहेत त्यांचे कशाही प्रकारे मन वळवून परत आणण्यासाठी महत्वाची बैठक झाल्याचे कागदपत्र आजही पोर्तुगीज दप्तरात आहेत , म्हणजे भारतीय आरमाराच्या स्थापनेत, जडणघडणीत पेणचाही महत्वपूर्ण सहभाग आहे हे निश्चित...

आजही पेणच्या परिसरात साकशी, कर्नाळा, माणिकगड, रत्नगड, मिरगड, सोनगिरी, सागरगड असे किल्ले आणि त्यावरील अवशेष पेणचे महत्व विशद करतात, शिवाजी

– धनाजी घरत, पेण

महाराजांनी निजामा कडून कोकण ताब्यात घेतले ते इस १६५६ ला, त्यानंतर, पेण मराठी साम्राज्याच्या अंतापर्यंत स्वराज्यात राहिले. पेशवेकाळात पराक्रमी सदाशिवराव भाऊंच्या पत्नी, पार्वतीबाई ह्या पेणमधील कोल्हटकर घराण्यातील होत्या. पेणच्या गढिचे थोडे फार अवशेष बाळगून असणारी कोट आळी आजही तिची आठवण जिवंत ठेऊन आहे,

स्वातंत्र्य संग्रामात पेणकर आघाडीवर होते. यात हुतात्मा विनायकराव कोल्हटकरांसारख्या अनेक सशस्त्र क्रांतिकारकांचाही समावेश होता. स्वातंत्र चळवळीच्या वेळी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनीही पेणला भेट दिली, लोकमान्य टिळकांनी पेणला कोकणातील पुणे असे संबोधून गौरव केला,

इस १८५७ च्या स्वातंत्र समराचा इतिहास आपल्या ”माझा प्रवास” या पुस्तकाने जगासमोर आणणारे गोडसे भटजी, तर असत्याग्रह आंदोलनाचे पहिले सत्याग्रही भारतरत्न आचार्य विनोबा भावे हे आपले पेणकरच...

पेणमध्ये तहसील कचेरी परिसरात, देव आळीतील कृष्ण मंदिर परिसरात, विश्वेश्वर मंदिर दीपमाळच्या पुढे असणाऱ्या परिसरातही समाधी आढळून येते मात्र तहसील कचेरी व कृष्ण मंदिर मठ परिसरातील समाधी सोडून बाकीच्यां समाधीचा इतिहास अजूनही अंधारातच आहे.

पूर्वी कुलाबा जिल्ह्याच्या लोकल बोर्डाचे कार्यालय व इतर जिल्हा स्तरीय कार्यालये देखील जिल्ह्यास मध्यवर्ती असणाऱ्या पेणमध्येच होती, मात्र हळूहळू ती आता अलिबागला स्थलांतरित झाली, मुबई- गोवा राष्ट्रीय महामार्गा वरचा पेण एक महत्वाचा थांबा! आजही मूलभूत सुविधांसाठी, हक्कासाठी सरकारशी झगडताना दिसतोय, पण हे सर्व होत असताना आपला वारसा विसरून कसे चालेल, हा इतिहास खरतर पेणकरानीच जपून ठेवायला हवा!!!
असा हा आपल्या पेणचा थोडक्यात इतिहास...



‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा. कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
श्री. प्रविण घागस
भाजपा युवा कार्यकर्ता
शुभेच्छुक
सौ.जयाताई प्रविण घागस
सरपंच ग्रामपंचायत म्हसा


सार्वजनिक बांधकाम विभाग, मुरबाड
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
सर्व शाखा अभियंता व कर्मचारी वृंद
श्री. संजय कोरडे
उपविभागीय अभियंता


मुरबाड तालुका खरेदी विक्री संघ
जीवनदीप वार्ता
सहाव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री. रमाकांत सासे सदस्य
श्री.चंद्रकांत बोष्टे सदस्य
श्री.मिलिंद मडके सदस्य
श्री.अनंत शिंगोळे सदस्य
श्री.संतोष भांगरथ सदस्य
सौं. हर्षला भोईर सदस्या
श्री. योगेश भोईर सदस्य
श्री संतोष वुळवी सदस्य
श्री नामदेव कंटे सदस्य
श्री.संतोष पवार
चेअरमन


ग्रुप ग्रामपंचायत शिरवली ( मा.)
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिन निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सारिका बारकु आगिवले
सरपंच
लक्ष्मण परसु बांगारा
उपसरपंच
शहाजी विठोबा नरूटे
ग्रामविकास अधिकारी


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. मोहन आत्माराम सासे
मा.नगराध्यक्ष मुरबाड नगरपंचायत
सौं.मधुरा मोहन सासे
नगरसेविका मुरबाड नगरपंचायत, प्रभाग क्र.१५


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री. दिपक शांताराम पवार
भारतीय जनता पार्टी
मुरबाड पुर्व तालुका मंडळ अध्यक्ष
शुभेच्छुक
ॲड. जितेंद्र भावार्थे
भारतीय जनता पार्टी
मुरबाड पश्चिम तालुका मंडळ अध्यक्ष


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन निमित्त दिन
हार्दिक शुभेच्छा
मनोज रमेश देसले
जनसेवक मुरबाड
शुभेच्छुक
सौ.मानसी मनोज देसले
मा.उपनगराध्यक्षा नगरपंचायत मुरबाड


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
सहाव्या वर्धापन दिन निमित्त
शुभेच्छुक
श्री.बाळाशेठ घरत
भाजपा युवा नेता,तथा उद्योजक म्हसा
सौं.रेश्माताई जयवंत(बाळा) घरत
सरपंच , ग्रामपंचायत कान्होळ बोरीवली
हार्दिक शुभेच्छा


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
६ व्या वर्धापन दिन निमित्त
मंगलमय शुभेच्छा
सुरेश नारायण बांगर (सर)
अध्यक्ष मानवसेवा सामाजिक संघटना, सरचिटणीस भाजपा मुरबाड
नितीन मोहपे (सर)
मा.जिल्हा सरचिटणीस भाजपा


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सौं. सिमाताई अनिल घरत
मा.उपसभापती पंचायत समिती मुरबाड
श्री. अनिल मेघराज घरत
मा.पंचायत समिती सदस्य तथा युवा नेता भाजपा

पर्यावरण आणि पर्यटन

लेख ८

# पर्यावरणाची काळजी ही माझी जबाबदारी

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी हे संत श्रेष्ठ तुकोबारायांचे शब्द कानी पडतात जीवनातील वृक्षवल्लीचे महत्व किती आहे हे अधोरेखित होते. माणसाच्या जीवनात लग्न सोहळा हा महत्त्वाचा मानबिंदू आहे हे आपणास ठाऊक आहे त्यामुळे आपल्या जीवनात सोयऱ्याचा मान सर्वानाच दिला जात नाही तर तो नात्याने खरोखरीच मोठा असतो व अगदी जवळचा असेल त्यालाच मान मिळतो. निसर्गराणी हिरव्यागार वनस्पतीमुळेच प्रसन्न दिसते. जेथे वनस्पती कमी असतात त्याला वाळवंट म्हणतात झाडाझुडपामुळेच हवामान शुद्ध राहते निसर्गातील शुद्ध हवा व प्रसन्न वातावरण म्हणजेच पर्यावरण.

शास्त्रीय कारण आपणास ठाऊक असेल की दिवसा वनस्पती कार्बन डाय-ऑक्साइड वायू घेतो व प्राणवायू सोडते वनराईचा हाच गुण माणसाने घेतला असता तर साऱ्या जगातील कटकटी मिटले असत्या. वनस्पतीप्रमाणे मानव वागेल तर तो मानव कसला. आताच्या आधुनिक युगापेक्षा प्राचीन काळ परवडला असे बोलण्याची वेळ येते. आजोबांनी लावलेली झाडे त्यांनी फळाची अपेक्षा कधी केलीच नाही तर ती फळे त्याचा मुलगा व नातू खातो. मुलगा व नातू झाडे लावण्याचा प्रयत्न करत नाहीत. त्याला वाटते की मी झाड लावले तर मी फळे खायला जगणार नाही मग मी झाड का लावावे? हे सर्वार्थाने खरे नसेलही. पण जे लोक झाडे लावतात तो सुद्धा हिमनगाचा एक अष्टमांश भाग समजवा. उरलेल्या सात अष्टमांश भागाचे काय? पर्यावरण हे सर्व श्री वनस्पतीवर अवलंबून आहे.

वनस्पती म्हटली की झाडे वेली एवढीच नाही तर आपण शेतात धनधान्य पेरतो ती सुद्धा एक वनस्पतीच असते. जर आपण पावसाळ्यात खलाटीला आपण नजर फिरवली तर संपूर्ण खलाटी हिरवीगार व मनाला मोहून टाकते. तेथील हवा व वातावरण शुद्ध असते. पण आज वनस्पतींच्या जंगला ऐवजी सिमेंटची जंगले वाढताना दिसत आहेत. आहे ती झाडे तोडली जात आहेत. झाडे लावून वाढविण्याचे कपट कोण घेत नाही. झाडे लावताना दिसतील तो सोन्याचा समजावा याचा परिणाम म्हणून वायु प्रदूषण वाढले आहे. पूर्वी गावागावात एखाद दुसरे वाहन असायचे आता तर घरोघरी चार चाकी आहे. आपण पाहिलात कर्मचाऱ्यांना चार दिवसाचा मंथ एन्ड आल्यावर अलिबाग मार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा लागतात तिकडे एक्सप्रेस हायवेवर अशीच परिस्थिती असते मुंगीच्या पावलाने गाड्या सरकत असतात त्यांच्या अनेक वर्तमानपत्रात मथळेच्या मथळे भरून येतात. आता या चारचाकी वाहनांनी सोडलेला धूर कोण पचवणार? पर्यायी सोयीचा मार्गच आपणाकडे नाही म्हणजे वायु प्रदूषण! एवढ्या वाहनांचा कर्कश आवाज तो कसा रोखणार? म्हणजे ध्वनी प्रदूषण कोणी बहिरे होतात, कोणाला ऐकू येते. आजारी पेशंट असला तर याची काय अवस्था होईल हे ईश्वरच जाणे.

कारखान्याचा विषय तर आपण बोलायलाच नको. कारखान्यांची धुरांडी सतत दूषित वायू ओकत असते. पेट्रो केमिकल सारख्या कारखान्यांची चिमणी सतत तेवत असते. अन कार्बन डाय-ऑक्साइड चा जणू फवारा सोडत असते. यावर उपाय कोण करणार? त्यासोबत कारखान्यातून बाहेर पडणारे केमिकल युक्त पाणी शुद्ध करण्याची क्षमता सर्वच कारखान्यात नाही, ते आहे तसे केमिकल युक्त पाणी जमिनीवर खड्डा खालून अथवा नदीच्या पात्रात सोडतात. जमिनीवरील पाण्याचा मानवाला त्रास होतो तर नदीतील पाण्याने मानवाला त्रास होतोच परंतु नदीतील जलचरांना आपले प्राण गमवावे लागते याचा विचार आम्ही का करावा?

घराची स्वच्छता ही घरापासूनच सुरू होते व घराजवळ येऊन थांबते आपण आपले घर अंगण स्वच्छ ठेवतो का? तसेच आपल्या घरामागील परसबाग सामुदायिक रस्ते याचा आपण विचारच करत नाही मी माझे घर अंगण रस्ता स्वच्छ करावा हे मनात येतच नाही. आपल्या कपड्यावर एकही डाग न पडणारे आम्ही वैयक्तिक व सामूहिक स्वच्छतेबाबत उदासीन का? आपले गाव व शहर दुसऱ्याने येऊन स्वच्छ करावे ह्यात काय मर्दुमकी आहे? वैयक्तिक व सामूहिक स्वच्छता हा एक पर्यावरणाचा भाग आहे हे आपणास समजावयास हवे.

असे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण होत आहे. त्याचा आपण गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. यावर उपाय कोण करणार? हा प्रश्न ऐरणीवर येतो. हाच प्रदूषणाचा भस्मासुर एक दिवस संपूर्ण पर्यावरणाला राक्षसी विळखा घालून गिळंकृत करणार आहे. यासाठी मानवा जागा हो. काळ हा आपल्या परीक्षेचा आहे आपण त्यात जर उत्तीर्ण झालो नाही तर आपल्यासारखे करंटे आपणच!

यासाठी चार दिवसापूर्वी एक साधू पुरुषांनी तीन गोष्टींचा उहापोह व्हॉटस अप वर केला.त्या मला पटल्या मी आपणास सांगणार आहे. साधू पुरुष म्हणतो. "एक वर्षभर कारखाने बंद ठेवले तर 20 टक्के लोक मरतील". "एक वर्षभर डॉक्टरांनी आपले काम केलेच नाही तर 50 टक्के लोक मरतील" "शेतकऱ्यांनी संपूर्ण वर्षभर काहीच काम केले नाही तर शंभर टक्के लोक मरतील" वरील तीन गोष्टींचा विचार करा. काहीतरी बोध घ्या पर्यावरणाचा संतुलन बिघडू नये यासाठी आत्ताच उठा व कामाला लागा. एक झाड लावा व जगवा! आपले घर व गाव स्वतःच स्वच्छ ठेवा मग सगळीकडे आनंदी आनंद. नाना वृक्षा वसुंधरा!

श्री गिरीधर पिंगळे गुरुजी
आकाशवाणी लेखक
गोरठण बुद्रुक खालापूर
मो : ९८२३७७९६०६



















Rangu
9850752580
9309587920

Amit
9321116660



MCC

# M.C. CHANDNANI CONST.CO.

"Committed to Superior Quality and Results"
REGD. GOVT. CONTRACTORS

**Spl. In: Road Construction, Hot Mix - Hot Laying of BM, AC & Ready Mix Concrete (RMC)**

OFFICE: A-212, Woodland Complex, New Link Road, Furniture Bazar, Ulhasnagar - 3.
PLANT: Survey No. 35 / 6, Maharalgaon, Kalyan - Murbad Road, Post Varap, Kalyan.
E-mail: mcchandnani@gmail.com

India's largest
producer & exporter of coated steel.

JSW Steel

## JSW Steel Coated Products Limited.
## Vasind Works

